# २०२० च्या जनगणनेत इंटरनेट च्या द्वारे प्रतिसाद देण्याचा पर्याय आहे

२०२० मध्ये केल्या जाणाऱ्या जनगणनेत युनायटेड स्टेस्ट मध्ये वास्तव्यास असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची नोंद केली जाणार आहे. जनगणना हि प्रत्येक १० वर्षांनी केली जाते आणि त्याद्वारे १.५ ट्रिलिअन डॉलर्स केंद्रीय (फेडरल) निधी हा दरवर्षी कशा विभागाला जातो ह्याची माहिती देण्यात येते.
२०२० ची जनगणना हि २०१० च्या तुलनेत खाली जे पर्याय नमूद केलेले आहेत त्यानुसार वेगळी असेल.

## २०२० च्या जनगणनेला तुम्ही ऑनलाइन प्रतिसाद देऊ शकता!

२०२० ची जनगणना हि पहिली अशी जनगणनाअसेल ज्यात प्रत्येक व्यक्ती आपलं उत्तर ऑनलाईन फॉर्म द्वारे नोंदवू शकेल. तुम्हाला मार्च महिन्याच्या सुमारे १५ तारखेच्या आसपास हा फॉर्म भरण्याचे आमंत्रण पाठवले जाईल. तुम्ही ज्या विभागात राहता, तो विभाग ऑनलाईन फॉर्म ला किती प्रमाणात प्रत्युत्तर देऊ शकेल त्यानुसार तुम्हाला ऑनलाईन फॉर्म भरण्याचे आमंत्रण मिळेल किंवा ऑनलाईन फॉर्म भारण्यासोबत पेपर प्रश्नावली पाठवली जाईल.

बहुतेक घरांना पोस्टाने पत्र पाठवण्यात येईल, ज्याद्वारे त्यांनी ऑनलाईन जनगणनेची माहिती भरावी ह्या साठी त्यांना प्रोत्साहित केलेले असेल. त्यात प्रत्येक घरासाठी नमूद केलेला विशेष ID आणि जनगणनेचे अधिकृत संकेत स्थळ नमूद केलेले असेल.

- खात्री करून घ्या कि तुम्ही २०२० च्या अधिकृत जनगणनेच्याच संकेत स्थळाला भेट देत आहात.
- तुम्हाला जो पात्रात ID दिलेला आहे त्याचा उपयोग तुम्ही जनगणनेचा फॉर्म भरताना करायचा आहे. ह्या फॉर्म मध्ये तुम्ही तुमच्या स्थानिक पत्त्यावर राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची नोंद करायची आहे. तुमच्या घराचा पाठवलेला ID जर चुकून गहाळ झाला तरी तुम्ही तुमचा पत्ता देऊन ऑनलाईन जनगणनेचा फॉर्म भरू शकता.

खालील दिलेल्या पर्यायाने तुम्ही जनगणनेचा फॉर्म हा संगणक, टॅबलेट किंवा स्मार्टफोन द्वारे सुद्धा भरू शकता.

- ऑनलाईन फॉर्म भरताना की- इंटरनेट एक्सप्लोरर, सफारी, क्रोम किंवा फायरफॉक्स चा वापर करावा.
- ऑनलाईन भरताना पीसी(संगणक), आयफोन आवृत्ती ५.० किंवा त्यापेक्षा पुढची आवृत्ती, बहुतांश आयपॅड च्या आवृत्या, सॅमसंग गॅलॅक्सि फोन आणि टॅब्लेट्स.

तुमच्या कडे इंटरनेट नसेल तरीही तुम्ही २०२० च्या जनगणनेत भाग घेऊ शकता.

- तुम्ही जर जनगणनेचा फॉर्म ऑनलाईन नाही भरला तर जनगणनेच्या कार्यलयातून तुम्हाला फॉर्म हा पेपर स्वरूपात पोस्टाने मेल जाण्याच्या चथ्या राउंड मध्ये पाठवण्यात येईल. चौथी राउंड हि जनगणनेच्या कार्यालयातून तुम्हाला सूचना आणि जनगणनेला उत्तर देण्यासाठीची आठवण म्हणून जे पत्रव्यवहार पाठवले जातात त्याचाच एक भाग आहे.

- काही ग्रंथालय आणि समुदाय संयोजक संस्था संगणक आणि टॅब्लेट्स सेट अप करतात जेथे तुम्हाला जाऊन जनगणनेचा फॉर्म भरता येऊ शकेल. एका डिव्हाइस वरून किती वेळेला प्रतिउत्तर तुम्ही देऊ शकता, फॉर्म भरू शकतात आणि ह्याला मर्यादा नसेल.

## खालील १२ इंग्लिश व्यतिरिक्त भाषांना दूरध्वनी आणि ऑनलाईन द्वारे सहाय्य

ऑनलाईन फॉर्म हा १२ इंग्लिश नसलेल्या भाषांमध्ये उपलब्ध आहे - हिस्पॅनिक, मॅण्डेरींन, व्हिएतनामी, कोरियन, रशियन, अरेबिक, टॅगलॉग (फिलिपाइन भाषा), पोलिश, फ्रेंच,हैतीअन, क्रिओल( कॅरिबियन बेटावरची भाषा), पोर्तुगीज आणि जॅपनीज.

तुम्ही जनगणनेचा फॉर्म दूरध्वनी द्वारे भरू शकता किंवा प्रश्न विचारू शकता. फोन व्दारे सहाय्य हे १२ नॉन-इंग्लिश भाषांमध्ये उपलब्ध आहे. हिस्पॅनिक, चायनीज (मॅण्डेरींन आणि कॅन्टोनीज), व्हिएतनामी, कोरियन, रशियन, अरेबिक, टॅगलॉग (फिलिपाइन भाषा), पोलिश, फ्रेंच,हैतीअन, क्रिओल( कॅरिबियन बेटावरची भाषा), पोर्तुगीज आणि जॅपनीज

पेपर फॉर्म हा फक्त इंग्लिश आणि स्पॅनिश भाषेमध्येच उपलब्ध आहे.

भाषा मार्गदर्शक, हे भाषांतरीत केलेले संदर्भ साधन असून लोकांना त्याचा उपयोग हा इंग्लिश फॉर्म भरण्यासाठी होऊ शकतो आणि ५९ नॉन-इंग्लिश भाषांचे शब्दकोश हे जनगणना कार्यलयाचे संकेतस्थळ - Census Bureau website: **https://www.census.gov/programs-surveys/decennial-census/2020-census/planningmanagement/language-resources.html** ह्या वर उपलब्ध आहे.

तुम्हाला तथ्य पत्र वाचायची असतील तर ***www.countusin2020.org/resources*** ह्या संकेतस्थळाला भेट द्या. येथे तुम्हाला जनगणनेचे फॉर्म कसे आहेत, त्यांना उत्तर कसे द्यायचे आणि अधिक मदत कशी मिळवायची ह्याची माहिती मिळू शकते.

## ऑनलाईन संसाधने सुरक्षित कसे ठेवू शकता

तुम्ही ऑनलाईन फॉर्म व्दारे भरलेली माहिती पूर्णपणे सुरक्षित राहील व्हायची काळजी जनगणनेच्या कार्यलाकडून घेतली जाईल. जनगणनेच्या कार्यलाकडून तुमची माहिती अशा सांकेतिक स्वरूपात रूपांतरित करण्यात येईल जी समजण्यास अवघड असेल. तुमची माहिती हि दोन वेळा एन्क्रिप्ट (कुटबद्ध) केली जाईल. तुम्ही जेव्हा "सबमिट" बटन दाबाल तेव्हा पहिल्यांदा तुमची माहिती एन्क्रिप्ट होईल. तुमचे उत्तर जेव्हा जनगणनेच्या डेटाबेस पर्यंत पोहोचेल तेव्हा दुसर्यांदा तुमची माहिती एन्क्रिप्ट होईल. जनगणनेचे कार्यालय तुम्ही तुमची माहिती जी ऑनलाईन फॉर्म द्वारे भरली आहे ती स्कॅमर, हॅकर, किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या डेटा चोरी करणाऱ्यांपासून सर्वतोपरी सुरक्षित राहिल, ह्याची काळजी घेईल.

जनगणनेच्या कार्यालयातून तुमची माहिती दुसऱ्या कोणत्याही सरकारी संस्था, इमिग्रेशन अधिकारी किंवा लोकांना सांगितली जाणार नाही. तुमच्या माहितीचे रक्षण करायला कडक कायदे कटिबद्ध आहेत. जनगणनेची उत्तर हि फक्त आकडेवारीच्या (स्टॅटिस्टिकस) साठीच वापरली जातात.

# The Internet Response Option in the 2020 Census

You can respond to the census:

- Online
- By phone
- Through the paper form

The Census Bureau will send you a notice in the mail with a household ID and a link to the official 2020 Census website

Go to the official Census 2020 website to respond

If you lose your household ID, you can still respond to the census online by providing your address

If you do not respond online or by phone, the Census Bureau will mail you a paper form

The Census Bureau's notice will contain a 2020 Census phone number

You can call that phone number to respond to the census

Language support for 12 non-English languages is available online and by phone

*Be sure to include every person that lives at your address when you fill out the form!*